# संवादिनी

जाणीव व वंचित विकासचे मासिक संवादपत्र

* वर्ष १३ वे * * जानेवारी-फेब्रुवारी २०२२ * * प्रसिद्धी- मार्च २०२२


**सप्रेम नमस्कार,**

वंचित विकास संस्था गेली अनेक वर्ष समाजातल्या विषमतेवर काम करते. अजूनही हे काम सतत करत रहावे लागणार आहे, कारण गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, धर्म,जात या भेदांबरोबरच उंच-बुटके, सावळे-गोरे,चष्मा असणारे-नसणारे, तिरळ्या डोळयांचे, अंध,रातांध, दात खूप पुढे असणारे,कोड असणारे,मूल नसणारे, दिव्यांग, बोबडे, जाड-बारीक,टक्कल असणारे... असे कितीतरी भेद आपण कळत नकळत करत असतो. आपल्या ते लक्षातही येत नाही, पण ज्यांच्यासमोर ते केले जातात त्यांना ते अस्वस्थ करतात.

अशा या सगळ्या भेदांच्या पलिकडे जाऊन आहे तसे माणूस स्वीकारण्यासाठी वंचित विकास संस्था काम करत आहे. आम्ही माणूस होण्याच्या प्रक्रियेत आहोत. त्यासाठी सगळ्यांनी एकमेकांना नैसर्गिक आणि भौतिक भेदासह स्वीकारुन माणूस म्हणून ओळखायला हवे. आपणही आपल्याला तपासून बघायला हवे नाही का?

माणसाकडे कोणत्याही लेबल शिवाय बघण्याच्या आमच्या या प्रयत्नात आपणही सहभागी व्हाल हा विश्वास आहे.

**मीना कुर्लेकर**
**सुनीता जोगळेकर**
**संचालक**

## संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा

* रविवार दि.२३ जानेवारी २०२२ रोजी कै.प्रभाकर शिवराम उर्फ मामासाहेब जोगळेकर यांच्या स्मरणार्थ वंचित विकास संस्थेला जोगळेकर कुलवृत्तांत समितीकडून पुरस्कार देण्यात आला. पुरस्कारात रु.दहा हजार एक आणि शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ आदीचा समावेश आहे. हा कार्यक्रम नीहार आनंद निवास येथे कोरोनाचे सर्व नियम पाळून संपन्न झाला.

या कार्यक्रमात बोलताना श्री जयंत जोगळेकर यांनी सामाजिक संस्थांना देणगी देऊन त्यांचे हात बळकट करण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अन्य सभासदांनी संस्थेला देणगी दिली.

* निर्मळ रानवारा या बालमासिकाच्या 'स्वप्न'या विषयावरील २०२०च्या दिवाळी विशेषांकाला मराठबोली,पुणे या संस्थेचे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. दि.३०जानेवारी २०२२ रोजी सन्मानचिन्ह देऊन रानवारा मासिकाचा गौरव करण्यात आला.

* गिरजाई प्रतिष्ठान,ठाणे ही संस्था अनेक वर्ष निरपेक्ष वृत्तीने सामाजिक सेवेचे व्रत घेतलेल्या महाराष्ट्राच्या विविध भागातील सामाजिक संस्थांचा सेवाव्रती पुरस्कार देऊन सन्मान करते. रविवार दि.२० फेब्रुवारी २०२२ रोजी ठाणे येथे वंचित विकास संस्थेला सेवाव्रती पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. यावेळी श्रीफळ, शाल, पुष्पगुच्छ, तसेच रु.२५०००/- देणगी दिली. हा पुरस्कार संस्थेच्यवतीने सहकार्यवाह श्रीमती देवयानी गोंगले, कार्यकारिणी सदस्य श्रीमती चैत्राली वाघ आणि श्रीमती मिनाक्षी नवले यांनी स्वीकारला.

## नाते समाजाशी

*** महाएनजीओ महाराष्ट्र, यांच्या विद्यमाने लोकशाही चॅनलसाठी बुधवार दि.९फेब्रुवारी २०२२ रोजी संस्थेच्या कार्यवाह आणि संचालक श्रीमती मीना कुर्लेकर यांची 'नाते समाजाशी' या विशेष कार्यक्रमात मुलाखत झाली. ती शनिवार दि.१२फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी ३.३०वा. प्रसारित करण्यात आली. आपल्याला ही मुलाखत यू ट्यूबवरही पाहता येईल.** https://www.youtube.com/watch?v=S_rNdU1s180

## नेत्र तपासणी शिबिर

डॉ. मनोहर डोळे मेडिकल फौंडेशन संचालित मोहन ठुसे मोबाईल आय क्लिनिकतर्फे आदरणीय विलास चाफेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दि.२४ जानेवारी २२ आणि दि.२५फेब्रुवारी २०२२ रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न झाले.

| गावाचे नाव | मोफत नेत्र तपासणी झालेल्या रुग्णांची संख्या | मोतीबिंदू आढळलेले रुग्ण | मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वी झालेले रुग्ण |
|---|---|---|---|
| * मु.पो.देवळेगाव ता.जुन्नर | ८२ | १८ | १० |
| * मु.पो.घोटीगाव ता.अकोले,जि.नगर | ९५ | १७ | ७ |

## पुणे मराठी ग्रंथालयाला पुस्तके भेट

* दि.२४ जानेवारी २२ रोजी वंचित विकास संस्थेने लहान मुलांसाठी ९८ व मोठ्यांसाठीची ७६ अशी एकूण १७४ पुस्तके पुणे मराठी ग्रंथालयाला भेट म्हणून देण्यात आली.

## संस्थेला मिळाली ट्रॅक्स तुफान

संस्थेसाठी विशेषतः नव्याने सुरु केलेल्या नीहार आनंद निवाससाठी के.एस.बी. केअर चॅरिटेबल ट्रस्टने शनिवार दि.५फेब्रुवारी २०२२ रोजी देणगी म्हणून संस्थेला ट्रक्स तुफान गाडी भेट दिली. आता एकूणच संस्थेच्या महाराष्ट्रभरातील कामासाठी गाडीमुळे सुकरता येणार आहे.

## विजयी विश्व तिरंगा प्यारा..

* संस्थेच्या केंद्र कार्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त झेंडावंदनाचा कार्यक्रम सकाळी ८वा.संस्थेचे खजिनदार श्री उध्दव भडसाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे इतर पदाधिकारी व सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

* नीहार आनंद निवास,लोहगाव येथे प्रजासत्ताकदिन उत्साहात साजरा झाला. संस्थेचे कार्यकर्ते श्री सुंदर सांगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.

* चंडिकादेवी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र, पाटणबोरी, जि. यवतमाळ येथे केंद्राच्या सल्लागार श्रीमती अंजली नालमवार यांच्या हस्ते प्रजासत्ताकदिनी ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी गावातील नागरिक, मुले, रुग्ण सहाय्यक प्रशिक्षणार्थी, शिवणवर्गाच्या प्रशिक्षणार्थी व कार्यकर्ते उपस्थित होते.

* संस्थेच्या लातूर येथील सबला महिला केंद्रातदेखील केंद्राच्या माजी प्रशिक्षणार्थी श्रीमती धनश्री वाकडे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी केंद्राच्या माजी प्रशिक्षणार्थी तसेच इतर अनेक महिला आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## मैत्रीला उजाळा

कोविडमुळे प्रत्यक्ष भेटीसाठी, गप्पांसाठी आतुर असणाऱ्या 'अभया'तील सर्व सख्यांचा चहापानाचा कार्यक्रम शनिवार दि.१९ फेब्रुवारी २०२२ रोजी केंद्र कार्यालयात संपन्न झाला. सर्वांची प्रत्यक्ष भेट खूप दिवसांनी झाल्यामुळे सगळ्याजणी खूप आनंदात होत्या. या सर्वांच्या भावना व्यक्त करणारी कविता –

मी आहे अभया ....
येथील सर्वचजणी आहेत,
माझ्या सखया ...
एकटीचा जीव होता दु:खी–कष्टी,
खूपजणी भेटल्या इथे,
करायला गप्पा–गोष्टी
इथे सगळ्याच सारख्या,
नाही कुणी लहान–मोठे ...
नाही वागायला लागत इथे
उगीचच खोटे–खोटे !
एकटीसाठी असतात खूप प्रसंग असह्य ...
इथे मात्र सगळ्यांसमवेत होतात,
सारेच ते सुसह्य !
एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ,
सर्वजणी व्हाव्या इथे
निर्भय आणि समर्थ !
मिळून साऱ्याजणी ह्या,
वाढत राहोत प्रतीवर्ष,
सर्वांना मिळो इथे मायेचा स्पर्श !

अभया सखी– लीनता

## तिळगूळ घ्या, गोड बोला...

* देवदासी व तृतीयपंथीयांसाठी आयोजित केलल्या हळदी–कुंकू कार्यक्रमाला श्रीमती मीना कुर्लेकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी श्रीमती मिनाक्षी नवले याही निमंत्रित होत्या. हा कार्यक्रम कनि महिला मंच यांनी दि.२८ जानेवारी २०२२ रोजी आयोजित केला होता. वंचित विकास संस्था पेरत असलेले नवीन विचार समाज हळूहळू स्वीकारत आहे हे अशा कार्यक्रमांमधून जाणवतं.

*डायसप्लॉट येथे संक्रांतीनिमित्त शुक्रवार दि.४फेब्रुवारी २०२२ रोजी हळदी–कुंकवाचा कार्यक्रम करण्यात आला. यावेळी ज्वेलरी तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यामुळे एकत्र येऊन चांगल्या गोष्टींची निर्मिती करण्याच्या प्रथेकडे एक पाऊल पडले. यावेळी ४५ महिलांनी सहभाग घेतला. संस्थेच्या कार्यकर्त्या श्रीमती शुभांगी ढोले यांनी महिलांना संस्थेची आणि अभया गटाची माहिती दिली.

तसेच ज्येष्ठ नागरिक, गंभीर आजार असणारे नागरिक आणि कायम अंथरुणावर असलेल्या एकूण १६ नागरिकांना व्हिलचेअरवर नेऊन त्यांचे लसीकरण करण्यात आले.

## नीहार आनंद निवास, पुणे येथील कक्षाचे नामकरण

नीहार आनंद निवासातील खोली नं.७ वर श्री रिताराणी शितोळे यांच्या नामफलकाचे अनावरण कार्यक्रम शनिवार दि.२९ जानेवारी २०२२ रोजी संपन्न झाला. यावेळी चार्टड अकाऊंट श्री अनिरुध्द अनगळ यांच्या हस्ते श्रीमती शितोळे यांना त्यांच्या नावाची नीहार आनंद निवास परिसराची फोटो फ्रेम देऊन सन्मान करण्यात आला.

https://www.youtube.com/watch?v=5c8gBBU_lWc

## आर्थिक सक्षमता

वंचित विकास संचालित सबला महिला केंद्र, लातूर आणि चंडिकादेवी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र,पाटणबोरी येथे कोरोना काळात ज्या छोट्या व्यवसायिकांचे व्यवसाय बंद पडले होते त्यांना पुन्हा उभं राहण्यासाठी साह्य करण्यात आले.

| अ.क्र. | विभाग | गावाचे नाव | संस्थेने केलेल्या मदतीचे स्वरुप | |
|---|---|---|---|---|
| १. | मराठवाडा लातूर | कासारगाव, | शिलाई मशीन – | १ |
| | | | शेळी – | २ |
| | | मळवटी | शिलाई मशीन – | १ |
| | | | शेळी – | ५ |
| | | कासरखेडा | शेळी – | १ |
| २ | विदर्भ जि. यवतमाळ ता. पांढरकवडा | पाटणबोरी | शिलाई मशिन – | १ |
| | | | फुले विक्री – | १ |
| | | | जनरल स्टोअर्स– | २ |
| | | | किराणा माल आणि जनरल स्टोअर्स – | २ |

## बाल आनंद मेळावा

जाणीव संघटना व वंचित विकास संस्था,पुणे यांच्यावतीने दि.९फेब्रुवारी २०२२ रोजी सरमकुंडी,ता.वाशी तसेच मौजे कन्हेरी येथील जिल्हा परिषद शाळेत बालआनंद मेळावा घेण्यात आला. यावेळी वैज्ञानिक दृष्टिकोन, अंधश्रध्दा निर्मूलन, हुंडाबंदी, दारुबंदी यावर गाणी, नकला, वक्तृत्व इ.उपक्रमांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमामध्ये २५०–३०० मुलामुलींनी सहभाग घेतला होता.

## रेम्बो सर्कस

'आपल्या अभिरुची वर्गातल्या आणि फुलवातल्या मुलामुलींनी सर्कस पहावी' हा विचार अभिरुची वर्ग घेणाऱ्या ताई–दादांच्या मनात आला आणि तो विचार प्रत्यक्षात येण्यासाठी ताई–दादांनी जी सर्कस केली ती मात्र सगळ्यांनी कौतुक करण्यासारखी होती.

सर्कस होती २६ तारखेला, पण त्याची तयारी अनेक दिवसांपासून चालू होती. कोण कोण येणार ? त्यांच्या पालकांना पण यायला सांगू या का? त्यांनी सुध्दा पाहिलेली नाही म्हणून काही मुलांचे पालकसुध्दा यायला तयार झाले. सर्कशीपर्यंत कसे जायचे? रिक्षा करावी का? मुलांकडे लक्ष देण्यासाठी काय करता येईल? मुलांना खाऊ काय देऊ या? सगळ्यांना मिळेल हे कसं बघायचं?

आपली मुलं कशी ओळखणार? सगळयांना सर्कस दिसेल असं बसवताना काय करावं लागेल? रिक्षा तिथेच थांबून राहतील का? येताना परत दुसऱ्या मिळतील का? हा सगळा खर्च आपल्या बजेटमध्ये कसा बसवणार? कारण जवळजवळ १३ वस्त्यांमधून मुलं सर्कस बघायला येणार होती. हे सगळं करत असताना मुलांना ताई–दादांनी रागावून चालणार नव्हते. मुलांना पडणाऱ्या प्रत्येक प्रश्नाला त्यांना उत्तर द्यायचे होते.

शेवटी तो दिवस उगवला. ताई–दादा सकाळपासून आपल्या नियोजनावर शेवटचा हात मारत घड्याळाकडे बघत होते. मुलांप्रमाणे ताई–दादा तयार झाले आणि मुलांनी सर्कशीचा अनुभव घेतला. 'सर्कस' म्हटलं की डोळ्यासमोर काय काय येतं? लहान मुलांचे डोळे तर सर्कशीचा एवढा मोठा तंबू बघूनच विस्फारतात. झोके घेणाऱ्या मुली आणि त्याच्या सहाय्याने केल्या जाणाऱ्या कसरती बघून तर मुलं आवाक होतात. हा सगळाच अनुभव वस्तीमधल्या तीनशे मुलांनी घेतला.

मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद बघून ताई–दादा खूप खुष झाले. एवढच नाहीतर सर्कसवाल्यांचा हा शो हाऊसफुल्ल गेल्याने कोविडच्या संकटावर मात करत आपला व्यवसाय करणाऱ्या सर्कसवाल्यांच्या चेहऱ्यावर स्मित आले.

## संत गाडगे बाबा जयंती आणि राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त ई–कचरा आणि प्लास्टिक कचरा संकलन

संत गाडगे बाबा जयंती आणि राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त पुणे महानगरपालिका आणि विविध सामाजिक संस्थांनी पेहेल २०२२ या नावाने ई–कचरा आणि प्लास्टिक कचरा संकलन मोहीम आयोजित केली होती.

समाजामध्ये ई–कचरा, प्लास्टिक पुनर्वापर आणि विल्हेवाट लावण्याची योग्य पध्दत याविषयी जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशाने दि. २७ फेब्रुवारी२२ रोजी पुण्यातील सुमारे ३०० केंद्रांवर ई–कचरा संकलन केले गेले.

हा कचरा पूर्णम इकोव्हिजन संस्थेकडे व शासनाच्या रिसायकल करणाऱ्या संस्थांना देण्यात आला. यामध्ये परिसरातील सर्व रहिवासी, वस्ती पातळीवर काम करणारे सर्व स्वयंसेवक, संस्थेव्दारे चालविले जाणारे अभिरुची वर्ग, विविध शाळा, कॉलेज यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला.

पर्यावरणास घातक असा कचरा संकलन करुन पुन:निर्मितीसाठी पाठविला गेला. 'हरित भारत... यासाठी सर्वांनी आपले मोलाचे योगदान दिले. नेहमी अशा प्रकारच्या स्तुत्य उपक्रमात सहभागी होण्यास संस्था नेहमीच तयार असते. यापुढेही सातत्याने हा उपक्रम सुरु राहील.

## जानेवारी-फेब्रुवारी २०२२मधील आर्थिक स्वरुपात देणगी देणारे देणगीदार

१.श्री संदीप लडकत आणि मित्रमंडळी,पुणे २.श्री निलेश खाडे,अलिबाग ३.श्री ऋतुराज पटवर्धन,पुणे ४.श्री सी टी पटवर्धन,पुणे ५.श्रीमती आशा धनवे,पुणे ६.श्री संग्राम गोविंद जाधव,पुणे ७.श्री रामदास हुले,पुणे ८.डॉ.मृणालिनी तडवळकर,पुणे ९.श्री.शिवाजी आपटे,बेंगलोर १०.श्रीमती सुचित्रा कर्वे,पुणे ११.श्रीमती सुशिला आंग्रे,पुणे १२.गुडविल कन्स्ट्रक्शन,पुणे १३.श्री सुरेश परांजपे,पुणे १४.श्री जयंत साबणे,पुणे १५.श्री अरविंद धारवाडकर,पुणे १६.श्रीमती अरुणा काळे,पुणे १७.श्री अरविंद बापट,पुणे १८.श्री विलास राजवाडे,पुणे १९.श्री माधव फडके,मुंबई २०.श्रीमती रश्मी कुलकर्णी,पुणे २१.श्रीमती ज्योती कुलकर्णी,पुणे २२.श्री अक्षय कुलकर्णी,पुणे २३.श्रीमती मृदुला कुलकर्णी,पुणे २४.श्री जीवराज चोले,पुणे २५.श्री रविंद्र बैतुले,पुणे २६.श्रीमती अनुराधा काळे,पुणे २७.श्रीमती प्रमिला साळवे,पुणे २८.श्रीमती कल्याणी पांड्ये,मुंबई २९.श्री लव गुप्ता,पुणे ३०.श्रीमती विनिता मंगळवेढेकर,पुणे ३१.श्रीमती मृणालिनी दातार,पुणे ३२.श्री जयेश जोगळेकर,पुणे ३३.जोगळेकर कुलवृत्तांत समिती,पुणे ३४.श्री मकरंद कुलकर्णी,पुणे ३५.जोगळेकर बंधू,नेनेघाट,पुणे ३६.श्रीमती ललिता राजवाडे,पुणे ३७.श्रीमती प्रचिती तोत्रे,रायगड,३८.श्रीमती सायली पानसे,पुणे ३९.श्री निरंजन कुलकर्णी,पुणे ४०.डॉ.प्र.प्र.डोके,पुणे ४१.श्रीमती रश्मी पांडे,पुणे ४२.श्रीमती शुभदा सडेकर,मुंबई ४३.श्रीमती ज्ञानेश्वरी जोगळेकर,मुंबई ४४.श्री योगेश यादव,पुणे ४५.श्री जयंत जोशी, ४६.श्री गणेश बापये,पुणे ४७.श्री माधव आगाशे,पुणे ४८. श्रीमती चैत्राली वाघ,पुणे ४९.श्रीमती सुजाता शहाणे,पुणे ५०.श्री विजय हरि भट,पुणे ५१.श्रीमती नेहा अभ्यंकर,मुंबई

५२.श्री हरिनारायण राठी चॅरिटेबल ट्रस्ट,पुणे ५३.श्रीमती सुचेता नाडकर्णी,पुणे ५४.श्री अशोक नाईक,पुणे ५५.श्री श्रेयस परांजपे,पुणे ५६.श्रीमती माया जंगम,पुणे ५७.श्री गिरीश दळवी,विरार,५८.श्री चंद्रशेखर फणसळकर,पुणे ५९.श्री अरविंद धारवाडकर,पुणे ६०.श्रीमती शोभा ठाकूर,पुणे ६१.श्रीमती सीमा गोगटे,मुंबई ६२.श्री सुरेश दामले,मुंबई ६३.श्री बाबूराव शिर्के,पुणे ६४.श्रीमती स्मिता करंबेळकर,पुणे ६५.श्रीमती निलिमा करकरे,पुणे ६६.अमेरिकन इंन्स्टिट्यूट ऑफ इंडियन स्टडिज,पुणे ६७.जाणीव युवा फाऊंडेशन,पुणे ६८.श्री मुरलीधर लेंभे,पुणे ६९.श्रीमती ज्योत्स्ना शिंदे,पुणे ७०.श्री विलास ठुसे,ठाणे ७१.श्रीमती अलकनंदा वाडेकर,पुणे ७२.श्रीमती स्वाती गोखले,मुंबई ७३.श्रीमती शीतल फडणीस,मुंबई ७४.श्रीमती मीना करंदीकर,मुंबई ७५ सूर्यध्वज प्रतिष्ठान,पुणे ७६.श्री मकरंद कुलकर्णी,पुणे ७७.श्री अजित नेर्लेकर,ठाणे ७८.श्रीमती सीमा करवडे,पुणे ७९.डॉ.संध्या रिसबूड,पुणे,८०.श्रीमती सानिका भिडे,पुणे

## जानेवारी-फेब्रुवारी २०२२मधील वस्तुरुपाने देणगी देणारे देणगीदार

१.श्री आनंद सहस्त्रबुध्दे,श्री श्लोक बांदिवडेकर,पुणे २.श्री सुरेश भावे,पुणे ३. Maersk Global Service Centre, Pune, ४.श्री आशिष कदम,पुणे ५.श्री संजय तांबोळी,पुणे ६.श्री जोगळेकर कुलवृत्तांत समिती,पुणे ७.श्री पांडुरंग पटवर्धन,पुणे ८.श्रीमती मीरा नाईक,पुणे ९.श्रीमती रोहिणी कुलकर्णी,पुणे १०.श्रीमती सुप्रिया धोंगडे,पुणे ११. श्रीमती मंगला गोडसे,पुणे १२. श्री नवनाथ मोझे,पुणे १३. श्री प्रशांत गुप्ता,पुणे १४. श्रीमती रिताराणी शितोळे,पुणे १५. श्री नंदकुमार मालुसरे,पुणे १६. श्रीमती सीमा करवडे,पुणे १७. श्री अभिजीत बोटे,पुणे १८. श्री निरंजन सोनी,पुणे १९. श्रीमती वर्षा भुतडा,पुणे २०. प्रेमानंद भागणे,पुणे २१. श्री जय सुरतवाला,पुणे.

## ** विनम्र आवाहन **

**संस्थेचे सर्व काम आपल्यासारख्या स्नेही आणि हितचिंतकांच्या सक्रिय सहभागामुळे प्रगतीच्या दिशेने सुरु आहे. आपण संस्थेसाठी बँकेच्या खात्यात देणगी जमा कराल त्यावेळी कृपया आम्हाला ७९७२०८६७३० या संस्थेच्या मोबाईल क्रमांकावर कळवावे. तसेच फॉर्म लिंक/QR कोड वरील माहिती भरुन पाठवावी. यामुळे आपल्याला त्वरित पावती पाठविता येईल.**

Google Forms

**✻ आपला Whats app क्रमांक तसेच ई-मेल पत्ताही जरुर कळवावा.**


# वंचित विकास

**केंद्र कार्यालय :४०५/९, नारायण पेठ, मोदी गणपती मागे, पुणे ४११०३०**

**फोन नं. : (०२०) २४४८३०५०/२४४५४६५८**

**मोबाईल नं. : ७९७२०८६७३०**

**ई-मेल : vanchitvikas85@gmail.com**

**वेब-साईट : http://vanchitvikas.org**

**संस्था नोंदणी : महा/२५५३/८६(पुणे)**

**न्यास नोंदणी : एफ ३१२१ (पुणे)**



# संवादिनी

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**

**वंचित विकास**

४०५/९, नारायण पेठ, मोदी गणपतीच्या मागे, पुणे ४११०३०

केवळ खाजगी वितरणासाठी (विनामूल्य)

**बुक-पोस्ट**


श्री/श्रीमती : ______________________

______________________

______________________

______________________

______________________